साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना : KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

* सातारा * वर्ष १ * अंक ११ * मराठी * सोमवार १० ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०२६ * PRGI. MHMAR/26/A3624 * पाने ४ * किंमत ३ रुपये

* Satara * Year 1 * Volume 11 * Marathi * Monday 10 August to 16 August 2026 * PRGI. MHMAR/26/A3624 * Page 4 * Price 3 Rs.

# नगराध्यक्षांच्या खांद्यावर बंदूक ठेवून लोकशाही आघाडी महायुतीवरच गोळ्या झाडते : विजय वाटेगावकर

## पालिकेतील गोंधळाला सत्ताधारीच जबाबदार; आ. अतुल भोसले यांच्या विकासकामांत अडथळे आणल्याचा आरोप

**कराड (हॅलो न्यूज)**

लोकशाही आघाडी नगराध्यक्षांच्या खांद्यावर बंदूक ठेवून महायुतीतच गोळ्या घालत आहे. महायुतीचे आमदार डॉ. अतुल भोसले यांची कामे अडवत आहे, असा घणाघाती आरोप पालिकेतील भाजपचे विरोधी पक्ष नेते विजय वाटेगवाकर यांनी आज केला. सत्ताधाऱ्यांनी केलेल्या आरोपांना उत्तर देण्यासाठी भाजपने पत्रकार परिषद घेतली. यावेळी नगरसेवक शिवाजी पवार, अजय पावसकर, आशुतोष डुबल, किशोरी शिंदे, वर्षा वास्के, सुहास जगताप, शहराध्यक्षा सौ. सुषमा लोखंडे, माजी शहराध्यक्ष एकनाथ बागडी, स्मीता हुलवान, वैभव माने, किरण मुळे उपस्थित होते.



पालिकेतील सत्ताधाऱ्यांमध्येच एकमत नाही, अशी स्थिती आहे, असे सांगून वाटेगावकर म्हणाले, पालिकेत महायुतीच्या घटक पक्षाचे नगराध्यक्ष आहेत. मात्र त्यांच्या खांद्यावर शरद पवार गटाची लोकशाही आघाडी बंदूक ठेवून राजकारण करत आहेत. महायुतीच्या घटक पक्षातील नगराध्यक्ष त्यांच्याच महायुतीतच गोळ्या झाडत आहे. ती बंदूक राष्ट्रवादी काँग्रेसची आहे आणि खांदा महायुतीच्या घटकपक्षाच्या नगराध्यक्षांचा आहे, ते विसरता कामा नये. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनीच गोंधळ घालयचा आणि त्याच खापर मात्र आमच्यावर फोडायचे, असेच सुरू आहे. एकमोकांविरोधात निवडणुक लढवताना महायुतीचा साक्षात्कार झाला नव्हता काय, या प्रश्नावर वाटेगावकर म्हणाले, तो प्रयत्न झाला होता. मात्र नगराध्यक्षपादावरून बिनसले. त्यामुळे सध्या पालिकेत सत्ताधारी स्वतःचे अपयश लपविण्यासाठी विरोधकांवर खापर फोडत आहेत. सभागृहात गोंधळ झाला. त्याला सत्ताधारीच जबाबदार आहेत. पालिकेत नागरिकांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला जात असताना त्यांना जाणीवपूर्वक बोलू दिले जात नाही. त्यांनी बैठकीला येतानाच ठरवून विषय हाणून पाडण्याचे ठरवत आक्रमक भुमिका घेतली होती.

पालिकेने निवडणुकीनंतर अत्यंत कमी सभा घेतल्या आहेत, असा आरोप करून वाटेगावकर म्हणाले, अन्य पालिकांत सहा ते सात सभा आणि स्थायी समितीच्या बैठकाही झाल्या; मात्र कराडला अवघ्या दोनच सभा घेतल्या आहेत. त्यात एका सभेत तब्बल १५७ विषय तर दुसऱ्या सभेत ६५ विषय होते. त्याच्या पोटात ३५० उपविषय ठेवले. इतक्या मोठ्या प्रमाणात विषय असूनही नगरसेवकांना वेळेत अहवाल दिले गेले नाहीत. अभ्यासासाठी आवश्यक कागदपत्रे सभेच्या आदल्या दिवशी दिली जातात, पध्दत योग्य नाही. अहवाल कमी वेळेत मिळत असल्याने नगरसेवकांना सखोल चर्चेची संधीच मिळत नाही. श्रद्धांजलीच्या ठरावावरही सत्ताधारी आमच्यावर चुकीचा आरोप करत आहेत. सभेची सुरुवात विषय क्रमांक एकपासून झाली. त्यानंतर विविध विषयावर चर्चा झाली. ती सुरू होण्यापूर्वीच श्रध्दांजलीचा कार्यक्रम वेळेवर घेण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची होती. ती सांभाळता आली नाही, मात्र त्याचे खापर विरोधकांवर फोडले जात आहे. त्याचे संपूर्ण चित्रीकरण उपलब्ध आमच्याकडे आहे. त्यांनी कधीही समोरा-समोर यावे. सभागृहातील चर्चेदरम्यान विरोधी सदस्य उभे राहिले की सत्ताधारी सदस्यांकडून गोंधळ घातला जातो, नगरसेवकांना विषयावर मत मांडू दिले जात नाही. शाळा, पाणीपुरवठा, कचरा डेपो, रस्ते, नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रश्न विचारले की उत्तर देण्याऐवजी गोंधळ घालून विषय दडपण्याचा प्रयत्न होत होता, हे काही योग्य नाही.

ते म्हणाले, शहराच्या विकासासाठी आमदार डॉ. भोसले यांनी सातत्याने मोटा निधी उपलब्ध करून दिला आहे. नेकलेस रोड, दैत्यनिर्वानी मंदिर संरक्षण भिंत, पूरानंतरच्या पाणीपुरवठा योजनेसाठी निधी, ब्रिटिशकालीन पुलाचे काम, कृष्णा नदी संरक्षण भिंत, पंचायत समिती इमारत, सार्वजनिक बांधकाम विभागाची इमारत अशा विविध विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणल्याचे सांगितले. त्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न सत्ताधारी करत आहेत. आम्हाला कोमाच्याही गुडबुकमध्ये जाण्याची गरज नाही. हा भाजप पक्ष आहे, येथे काम सर्वच एकसमान असतात. त्यामुळे कोणी कोणाच्या गुडबुकमध्ये जाण्यासाठी धडपडत नाही. नेकलेस रस्ता व मंगळवार पेठेतील उद्यान मंजूर झालेल्या निधीबाबतही अडचण आणली जात आहे. १९८६ पासून ती जागा घाण व अतिक्रमणामुळे नागरिकांसाठी त्रासदायक होती. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार तेथे उद्यान, संरक्षक भिंत, पाथवे व वृक्षारोपणासाठी सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आता अचानक त्याच ठिकाणी व्यावसायिक संकुलाची मागणी करून राजकारण केले जात आहे. नेकलेस रोडसाठी सुमारे ६८० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध मिळणार आहे. अनेक वर्षे प्रलंबित असलेले हे स्वप्न साकार करण्यासाठी आमदार डॉ. अतुल भोसले यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे त्यांनी नमूद केले. विकासाच्या कामांमध्ये राजकारण न करता सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची आमदारांची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. वास्तविक राजकारण तेच करत आहेत. पालिकेच्या शाळेत पीएम श्री शाळा योजनेच्या उद्घाटन कार्यक्रमात स्थानिक आमदार, खासदार व केंद्र शासनाच्या योजनेचा आवश्यक प्रोटोकॉल पाळला गेला नाही. त्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. केंद्र शासनाच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या योजनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही फोटो तेथे नव्हता, असेही ते म्हणाले.

# मलकापूर पालिका सभा बांधकाम विभागाच्या कामकाजावरून चांगलीच गाजली

## रस्त्यांच्या दर्जापासून करआकारणीपर्यंत नगरसेवकांचे सवाल : २० टक्के मालमत्ता करवाढीला मंजुरी

**कराड (हॅलो न्यूज)**

मलकापूर नगरपालिकेची गुरुवारी झालेली सर्वसाधारण सभा बांधकाम विभागाच्या कामकाजावरून चांगलीच गाजली. सत्ताधारी गटातील नगरसेवकांनीच अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला धारेवर धरल्याने सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. त्याचवेळी शहरातील रस्ते, ड्रेनेज, सीसीटीव्ही, वृक्षारोपण, पाणीपुरवठा आणि अन्य विकासकामांशी संबंधित महत्त्वाच्या विषयांनाही सभेने मंजुरी दिली.

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष तेजस सोनावले होते. यावेळी उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे, मुख्याधिकारी कपिल जगताप, नियोजन सभापती सूरज शेवाळे यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.




बांधकाम विभागाच्या विषयांवर चर्चा सुरू होताच नगरसेवक प्रमोद शिंदे यांनी ठेकेदार नगरसेवकांशी उद्धटपणे वागत असल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांना समज देण्याची मागणी केली. त्यानंतर सूरज शेवाळे यांनी माळीनगर येथील रस्त्यांच्या पॅचवर्कबाबत बांधकाम विभागाचे अधिकारी योगेश गुरव यांना धारेवर धरत, सभागृहाची दिशाभूल करू नका, चुकीची माहिती देऊ नका, अशा शब्दांत संताप व्यक्त केला. यावर उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे यांनीही अधिकाऱ्यांना अचूक माहिती घेऊनच सभागृहात यावे, अशी तंबी दिली. नगरसेवक धनंजय येडगे यांनी रस्त्यांच्या कामांबाबत तांत्रिक प्रश्नांची सरबत्ती करत कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

तर स्वाती थोरात यांनी ठेकेदारांकडून दर्जेदार कामे करून घेण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. भीमाशंकर माऊर यांनी गोकाक पाणीपुरवठा संस्थेने रस्त्यासाठी जागा दिल्याबद्दल आभार मानत काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. यावर मनोहर शिंदे यांनी शासन नियमानुसार आवश्यक मंजुरीनंतरच पुढील कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट केले.

याशिवाय दादा शिंगण, दीपाली पवार आणि गीता साठे यांनीही विविध विकासकामे, नागरिकांच्या सुविधा आणि प्रलंबित प्रश्नांवर मुद्दे उपस्थित करत प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याची मागणी केली. नगरसेवक नितीन काशीद यांनी कर आकारणीच्या मुद्यावर प्रशासनावर प्रश्नांचा भडिमार करत कर वसुली, थकबाकी आणि धोरणाबाबत सविस्तर खुलासा मागितला.

# पाटणच्या ग्रामीण रूग्णालयातील सोई सुविधावरून सभागृहात संताप

## पाटण पंचायत समितीच्या मासिक सभेत औषधे, स्वच्छतागृहांसह कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येचा मुद्दा ऐरणीवर

**पाटण (हॅलो न्यूज)**

पाटण ग्रामीण रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असून कर्मचाऱ्यांची संख्याही अपुरी आहे. रात्रीच्या वेळी उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना औषधे मिळत नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. स्वच्छतागृहाची दूरवस्था आहे. सुविधा मिळत नाहीत. मग कोट्यवधी रुपये खर्च करून उपजिल्हा रुग्णालयाची इमारत बांधून उपयोग काय, असा संतप्त सवाल करून अत्याधुनिक इमारत असूनही अपेक्षित फायदा रुग्णांना मिळणार नसेल तर लोकनेत्यांच्या नावाने असलेल्या पाटण ग्रामीण रुग्णालयाची सेवा आणि व्यवस्था नावाला साजेशी आहे काय, अशी भावना विरोधी सदस्य शंकर घाडगे यांनी सभागृहात व्यक्त केली.

पाटण पंचायत समितीच्या सभापती सौ. महाबळ यांच्या अध्यक्षतेखाली मासिक सभा पार पडली. यावेळी उपसभापती विजय पवार, गटविकास अधिकारी सरिता पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी शिक्षणमहर्षी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कोयना जलाशयाला छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर नाव दिल्याबद्दल मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला.

पाटण तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हे रुग्णालय अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करून समस्या जाणून घ्याव्यात आणि रिक्त पदे तातडीने भरून औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, तसेच रुग्णालयात स्वच्छतागृहाची व्यवस्था सुधारणा झाली पाहिजे, अशा सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.

संपादकीय

# तुकाराम मुंढे यांची संपूर्ण कारकीर्द वादळी

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना सील करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.

सध्या बहुचर्चित असलेल्या जेन झी च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंढेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं-उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप-परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंढे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही.

सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना शिपाई (वर्ग-४ कर्मचारी) उपलब्ध करून द्यावेत : संग्रामबाबा पवार

**सातारा, (हॅलो न्यूज)**

सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ, आरोग्यदायी व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळण्यासाठी प्रत्येक शाळेत किमान एक शिपाई (वर्ग-४ कर्मचारी) उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी पंचायत समिती कराडचे सदस्य संग्रामबाबा अधिकराव पवार यांनी केली आहे.

यावाबत त्यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सौ. प्रियाताई शिंदे यांना निवेदन देऊन शिपाई पदे उपलब्ध करून देण्याची मागणी केली.



जिल्हा परिषद शाळांमध्ये शिपाई उपलब्ध नसल्यामुळे शाळेतील दैनंदिन व्यवस्थापनाची अनेक कामे शिक्षकांनाच करावी लागत आहेत. परिणामी शिक्षकांचा अध्यापनाव्यतिरिक्त कामांमध्ये वेळ जात असून त्याचा अप्रत्यक्ष परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर होत आहे.

शाळेत शिपाई उपलब्ध झाल्यास शाळा व शाळा परिसराची नियमित स्वच्छता व देखभाल, विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पाणी व्यवस्था, स्वच्छतागृहांची स्वच्छता, शाळा परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर लक्ष ठेवणे, भटकी जनावरे व इतर संभाव्य धोक्यांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण, शालेय साहित्य व मालमत्तेची देखभाल तसेच पीएम पोषण योजनेअंतर्गत प्राप्त होणारे अन्नधान्य व साहित्य स्वीकारणे, साठवणे व देखभाल करणे यासारखी कामे प्रभावीपणे पार पाडता येतील. शिक्षणाचा अधिकार कायदा (आरटीई) आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे, असे श्री. पवार यांनी निवेदनात नमूद केले. सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाच्या जिल्हा परिषद अर्थसंकल्पात आवश्यक आर्थिक तरतूद करून सातारा जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी किमान एक शिपाई (वर्ग-४ कर्मचारी) उपलब्ध करून द्यावा आणि आवश्यक असल्यास शासनाकडे प्रस्ताव सादर करून नियुक्तीची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी, शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी या मागणीवर सकारात्मक व तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा श्री. संग्रामबाबा पवार यांनी व्यक्त केली.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त हर घर तिरंगा अभियान प्रभावीपणे राबवा : जिल्हाधिकारी संतोष पाटील

**सातारा, जिमाका**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात हर घर तिरंगा अभियान उत्साहात आणि लोकसहभागातून राबविण्यात यावे, तसेच १३, १४ आणि १५ ऑगस्ट या तीन दिवसांत प्रत्येक शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय आणि प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकविण्यात यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सर्व संबंधित विभागांना दिल्या.

हर घर तिरंगा अभियानाच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे, प्रांताधिकारी आशिष बारकुल आणि नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

तिरंगा फडकविताना ध्वज संहितेचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक असून राष्ट्रध्वजाचा सन्मान अबाधित राहील याची सर्वांनी दक्षता घ्यावी, तसेच विशेषत: १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण तसेच ध्वजावतरण करताना ध्वज संहितेचे सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी दिले.

१४ ऑगस्ट रोजी फाळणी विभीषिका स्मृती दिन निमित्त भारताच्या फाळणीदरम्यान प्राण गमावलेल्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. या शिवाय ९ ते १३ ऑगस्ट या कालावधीत वंदे मातरम्चे सामूहिक गायन शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये व विविध संस्थांमध्ये आयोजित करण्याचे नियोजन करावे. स्वातंत्र्यदिनानिमित्त स्वातंत्र्य रॅलीचे प्रभावी नियोजन प्रत्येक विभागाने करावे. या रॅलीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध संस्था, विद्यार्थी, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केले.

# मराठा संघर्षयोद्धा जरांगे पाटील कराड दौऱ्यावर

## ११ व १२ ऑगस्टला मसूर व आटके येथे जाहीर संवाद बैठक

**कराड (हॅलो न्यूज)**

मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर संवाद साधण्यासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा पश्चिम महाराष्ट्र दौरा आयोजित करण्यात आला आहे. त्याअंतर्गत सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात ११ व १२ ऑगस्ट रोजी दोन जाहीर संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



दौऱ्याच्या पहिल्या दिवशी, ११ ऑगस्ट रोजी मसूर येथे, तर दुसऱ्या दिवशी १२ ऑगस्ट रोजी आटके येथे मनोज जरांगे पाटील यांची जाहीर संवाद बैठक होणार आहे. या सभांमध्ये मराठा समाजातील युवक-युवती, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व समाजबांधवांशी थेट संवाद साधला जाणार आहे.

या दौऱ्याचा मुख्य उद्देश मराठा समाजातील नागरिकांच्या विविध अडचणी जाणून घेणे, शैक्षणिक व रोजगारासंदर्भातील प्रश्न समजून घेणे, आरक्षणाशी संबंधित दाखले मिळविताना येणाऱ्या अडचणी, तसेच समाजाला मिळालेल्या आरक्षणाच्या अनुषंगाने शासकीय स्तरावर भेडसावणाऱ्या समस्यांची माहिती घेणे हा आहे. संबंधित विषयांवर मार्गदर्शन करून शासनाकडे पाठपुरावा करण्याचाही प्रयत्न करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर कराड दक्षिण व कराड उत्तर तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजातील सर्व बंधू-भगिनी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक तसेच समाजबांधवांनी मोठ्या संख्येने दोन्ही बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कराडमध्ये अन्न व औषध प्रशासनाकडेन दोन हॉटेल सील, तीनवर कारवाई

**कराड (हॅलो न्यूज)**

अन्न व औषध प्रशासन विभागाने शहरातील विविध हॉटेलची आज अचानक तपासणी केली. या तपासणीत दोन हॉटेलमध्ये मुदतबाह्य थंड पेयाची विक्री व अन्य काही संशयास्पद खाद्यपदार्थ आढळून आले. त्यामुळे संबंधित हॉटेल पुढील आदेश येईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्य तीन हॉटेलांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. त्याचबरोबर तासवडे एमआयडीसीत गुळही सील केल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त तुषार शिंगाडे यांनी दिली.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त मुंढे यांनी सुरू केलेल्या ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टलवर शहरातील काही हॉटेलबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहाय्यक आयुक्त शिंगाडे, अन्न सुरक्षा अधिकारी वंदना रुपनवर यांनी हॉटेलची तपासणी केली. तपासणी दरम्यान काही ठिकाणी अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक स्वरूपात निदर्शनास आले. काही खाद्यपदार्थ संशयास्पद आढळल्याने त्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तासवडे औद्योगिक वसाहतीत पॅकींगवर माहिती न देताच गुळाचे पॅकींग करुन तो अन्यत्र पाठवण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे आज सहाय्यक आयुक्त शिंगाडे व त्यांच्या पथकाने तेथे तपासणी केली. तेथे सुमारे तीन लाखांचा गुळ सील करण्यात आला. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या या धडक कारवाईमुळे शहरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

* Satara * Vol- 11 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करून पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# मतदार यादीच्या पुनरिक्षणात कराड दक्षिणची ‘शंभर नंबरी’ कामगिरी!

### पुणे विभागात प्रथम; महाराष्ट्रातील सातवा मतदारसंघ, ३ लाख ३ हजार २०२ मतदारांच्या नोंदींचे काम पूर्ण

**कराड (हॅलो न्यूज)**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण अभियानात कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघाने उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. मतदार यादीच्या पुनरिक्षणाचे १०० टक्के काम पूर्ण करणारा पुणे विभागातील पहिला आणि राज्यातील सातवा विधानसभा मतदारसंघ ठरण्याचा मान कराड दक्षिणने मिळवला आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि विविध शासकीय विभागांनी समन्वयाने केलेल्या अथक प्रयत्नांमुळे ही कामगिरी साध्य झाल्याची माहिती मतदान नोंदणी अधिकारी तथा कराडचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी दिली.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ३० जूनपासून सुरू झालेल्या विशेष सखोल पुनरिक्षण अभियानात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी मतदारांच्या घरोघरी भेटी देत मतदार यादीतील नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली. कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात ३४२ मतदान केंद्रे असून ३ लाख ३ हजार २०२ मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये १ लाख ५० हजार २६ महिला, १ लाख ५३ हजार १४२ पुरुष आणि ३४ इतर मतदारांचा समावेश आहे.

विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबविण्यात आले. मतदारांच्या नोंदींची घरभेटीद्वारे तपासणी, माहितीची पडताळणी आणि आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याची प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात आली.

या मोहिमेत सातारा तहसीलदार रोहिणी शिंदे, कराडचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, मलकापूरचे मुख्याधिकारी कपिल जगताप, सहाय्यक गटविकास अधिकारी शैलेश पाटील, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश विभुते, निवासी नायब तहसीलदार बाबूराव राठोड, महसूल नायब तहसीलदार महेश उबारे यांच्यासह मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सहायक मतदार नोंदणी अधिकारी, मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, शिक्षक, केंद्रप्रमुख, महसूल कर्मचारी, पोलीस पाटील, आशा व अंगणवाडी सेविका, विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी, संकलन पथक तसेच आयटी टीमने परस्पर समन्वयातून काम केले. दरम्यान, ३ ते ८ ऑगस्टदरम्यान अनकलेक्टेबल फॉर्मची फेरपडताळणी, मॅपिंग न झालेल्या मतदारांची माहिती अद्ययावत करणे, नोंदींमधील त्रुटी दूर करणे आणि डिजिटाइज केलेल्या नोंदींची पुढील टप्प्यात तपासणी केली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत होण्यास मदत होणार असल्याचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी सांगितले.

# पाटणकरांना मोफत वीज मागणीसाठी आझाद मैदानावर उपोषण

### गोरख नारकर यांची आक्रमक भूमिका

**पाटण, (हॅलो न्यूज)**

पाटण तालुक्यातील नागरिकांना घरगुती वापरासाठी मोफत वीज मिळावी, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत एक महिन्याची मुदत दिली होती. मात्र, मुदत संपूनही शासनाकडून कोणताही निर्णय न झाल्याने मनसेचे पाटण तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांनी बुधवार, दि. १२ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.



नारकर यांनी याबाबतचे निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ऊर्जा मंत्री तसेच संबंधित मंत्री वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविले आहे. पाटण तालुक्यातील कोयना जलविद्युत प्रकल्प, पवनऊर्जा प्रकल्प आणि इतर ऊर्जा प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होत असताना स्थानिक नागरिकांना घरगुती वापरासाठी मोफत वीज मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.

याच मागणीसाठी मनसेच्या वतीने १५ मे २०२६ रोजी पाटण ते मुंबई पदयात्रा काढण्यात आली होती. त्या दरम्यान सातारा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. त्यावेळी एका महिन्यात सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मिळाल्याने नाडे येथील शिवतीर्थावर पदयात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर २१ मे आणि २४ जून रोजी शासनाला स्मरणपत्रेही देण्यात आली. मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप गोरख नारकर यांनी केला आहे. त्यामुळे आता १२ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जिल्ह्यात विजेच्या धक्क्याने घेतले १३ बळी

**सातारा (हॅलो न्यूज)**

शेतात वीजपंप सुरू करण्यासाठी गेलेल्या एका युवकाचा विद्युत नियंत्रण पेटीचा वीजेचा धक्का बसून दुर्दैवी मृत्यु झाला. विंग (ता. कराड) येथील कणसेमळा परिसरात ही घटना आज सकाळी घडली. वैभव कृष्णत नलवडे वय (२२) असे संबधीत युवकाचे नाव आहे. जीवला चटका लावणाऱ्या घटनेने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची नोंद तालुका पोलीसात झाली आहे.



**सातारा जिल्ह्यातील विजेच्या दुर्दैवी घटना**

८ जुलै २०२६ फलटण मधील खामगाव येथे विजेच्या धक्क्याने एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

जून महिन्यात घोगाव येथे डीपीवर चढलेल्या एकाचा विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

जून महिन्यात नातू-आजीचा विजेच्या तारेच्या स्पर्शाने मृत्यू : माण तालुक्यातील मार्डी गावातील काळेवस्ती परिसरात शेळीचा जीव वाचवण्यासाठी धावलेल्या नातवाला आणि नातवाला वाचवण्यासाठी गेलेल्या आजीचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाला.

एप्रिल महिन्यात कराड तालुक्यातील भोळेवाडीत अवकाळी पावसातील विजेच्या कडकडाटात शेतकरी दाम्पत्यावर वीज कोसळून सतीश सूर्यवंशी हे जागीच ठार झाले, तर त्यांची पत्नी उषा सुर्यवंशी या गंभीरपणे जखमी झाल्या.

माण तालुक्यातील दानवलेवाडी येथील भारतीय सैन्यदलातील जवान प्रशांत कदम हे एप्रिल महिन्यात घरात विद्युत मोटारीचे काम करत असताना त्यांना विजेचा तीव्र शॉक लागला व त्यात त्यांचा मृत्यू झाला.

वाई तालुक्यातील आसले गावच्या शिवारात मार्च २०२६ रोजी विजेचा तीव्र धक्का लागल्याने मृत्यू झाला आहे.

मे २०२६ मध्ये पाणवन (ता. माण) येथे शेतातील विहिरीत मोटर सोडताना विजेचा धक्का लागून एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

किरपे, ता. कराड येथील शेतकऱ्याचा शेतात विद्युत मोटार सुरू करण्यास गेले असता मोटारीचा विद्युत प्रवाहाचा शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याची घटना जुलै २०२६ मध्ये घडली.

४ ऑगस्ट कराड तालुक्यातील विंग येथे एका युवा शेतकऱ्यांचा शेतात मोटार सुरू करताना विजेच्या धक्क्याने मृत्य

# दिल्लीतील दोन गुजराती नेत्यांना हटवा; मराठी माणूस पंतप्रधान झाला तर आनंदच

### कराडमध्ये विजय वडेट्टीवारांचा भाजपवर हल्लाबोल

**कराड (हॅलो न्यूज)**

कराड दौऱ्यावर आलेले काँग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजप, महायुती सरकार आणि केंद्रातील नेतृत्वावर जोरदार हल्लाबोल करत अनेक राजकीय वक्तव्ये केली. पंकजा मुंडे यांच्यावर भाजपमध्ये अन्याय होत असल्याचा दावा करत त्यांना काँग्रेसमध्ये येण्याची खुली ऑफर दिली. तसेच, राज्यातील मराठी माणूस पंतप्रधान झाला तर आनंदच आहे; मात्र त्यासाठी दिल्लीतील दोन गुजराती नेत्यांना हटवावे लागेल, असे वक्तव्य करत त्यांनी केंद्रातील भाजप नेतृत्वावरही निशाणा साधला.



पंकजा मुंडे यांच्या राजकीय भविष्यावर भाष्य करताना वडेट्टीवार म्हणाले की, भाजपमध्ये पक्षासाठी आयुष्य घालवणाऱ्या अनेक ज्येष्ठ नेत्यांचा आवाज दाबला जात आहे. पंकजा मुंडे यांच्यावरही सातत्याने अन्याय होत असून, एवढ्या मोठ्या राजकीय कारकिर्दीनंतर त्यांना संन्यासाची भाषा करावी लागत आहे, ही दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी म्हटले. पंकजा मुंडे काँग्रेसमध्ये आल्या तर त्यांना राज्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याची संधी देऊ, असे सांगत त्यांनी त्यांना जाहीर निमंत्रण दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पंतप्रधान होण्याच्या चर्चेवर बोलताना वडेट्टीवार म्हणाले, मराठी माणूस पंतप्रधान झाला तर महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असेल. मात्र, त्यासाठी आधी दिल्लीतील दोन गुजराती नेत्यांना हटवावे लागेल. त्यानंतरच खरा आनंद साजरा करता येईल. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.

सुनेत्रा पवार यांच्याबाबत सुरू असलेल्या गुंगी गुडिया वादावरही त्यांनी भूमिका स्पष्ट केली. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही एकेकाळी गुंगी गुडिया असे संबोधले जात होते. हा शब्द अपमानास्पद नसून त्याचे राजकारण करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सुनेत्रा पवार यांच्याबद्दल काँग्रेसला पूर्ण आदर आहे. त्या गुंगी गुडिया नाहीत. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने आपण लढवय्या आहोत, दुर्गा आहोत, झाशीची राणी आहोत, हे सिद्ध करून दाखवावे, अशा शब्दांत त्यांनी त्यांना शुभेच्छाही दिल्या.



# वंदे मातरम गीत गायन स्पर्धेत जनकल्याणचे सरस्वती विद्यामंदिर प्रथम

**कराड (हॅलो न्यूज)**

ज्ञानभारती कराड,जिजामाता स्मारक समिती,पुणे व शिक्षण मंडळ, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संपूर्ण वंदे मातरम गीत गायन व पाठांतर स्पर्धा शिक्षण मंडळ,कराडमध्ये उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेत कराड परिसरातील १५ शाळातील ३० समूहाने व २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सुरेल गायन,स्पष्ट उच्चार,शिस्तबद्ध सादरीकरण आणि पारंपारिक वेशभूषेत विविध संघानी संपूर्ण वंदे मातरम गीताचे सादरीकरण तथा पाठांतर केले.

या कार्यक्रमास शिक्षण मंडळाचे सचिव चंद्रशेखर देशपांडे, परीक्षक आलापिनी जोशी, गायत्री कुलकर्णी, शुभदा पटवर्धन व प्रायोजक कांचन विंगकर, योगेश कदम आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुवर्णा देशपांडे व डॉ. सुचेता हुद्देदार यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

लहान गट - प्रथम-जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शिक्षण मंडळ,कराड संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा

तृतीय-पोदार इंटरनॅशनल स्कूल

मध्यम गट

प्रथम -जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शेठ रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला,कराड

तृतीय-शिक्षण मंडळ, कराड संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा

मोठा गट

प्रथम-जनकल्याण प्रतिष्ठान संचालित सरस्वती विद्यामंदिर

द्वितीय-शेठ रामबिलास किसन लाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड

तृतीय-टिळक हायस्कूल,कराड

# कापीलच्या युवा उद्योजक भाऊसाहेब ढेबे-पाटील यांच्या ‘भूमियुग’ म्हैसपालन प्रकल्पास आमदार विनय कोरे यांची सदिच्छा भेट

**कराड (हॅलो न्यूज)**

कापील येथील श्रीकल्पवृक्ष उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा उद्योजक भाऊसाहेब ढेबे-पाटील यांनी उभारलेल्या ‘भूमियुग’ या आधुनिक म्हैसपालन प्रकल्पास जनसुराज्य पक्षाचे अध्यक्ष तथा आमदार विनयजी कोरे सावकार यांनी सदिच्छा भेट देत प्रकल्पाची सविस्तर पाहणी केली. आधुनिक तंत्रज्ञान, नियोजनबद्ध व्यवस्थापन आणि शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून उभा राहिलेला हा प्रकल्प ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार यावेळी आमदार कोरे सावकार यांनी काढले.



प्रकल्पाची पाहणी करताना आमदार विनयजी कोरे सावकार यांनी म्हैसपालनातील आधुनिक सुविधा, जनावरांची निगा, चारा व्यवस्थापन, स्वच्छता, दूध उत्पादनाची प्रक्रिया तसेच व्यवसायाचे नियोजन याबाबत माहिती घेतली. कमी कालावधीत भाऊसाहेब ढेबे-पाटील यांनी उभा केलेला उद्योग पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी बोलताना आमदार विनयजी कोरे सावकार म्हणाले, यश सहज मिळत नाही. त्यामागे अथक परिश्रम, जिद्द, सातत्य आणि दूरदृष्टी आवश्यक असते. भाऊसाहेब ढेबे-पाटील यांनी शून्यातून विश्व निर्माण करून ग्रामीण भागातील युवकांसमोर एक आदर्श उभा केला आहे. शेतीसोबत पूरक व्यवसाय उभारल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढू शकते. त्यामुळे युवकांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता उद्योग आणि शेतीपूरक व्यवसायाकडे वळणे ही काळाची गरज आहे.

यावेळी आमदार कोरे सावकार यांनी भाऊसाहेब ढेबे-पाटील यांच्या संघर्षमय प्रवासाचे विशेष कौतुक केले. अनेक अडचणी, संकटे आणि आर्थिक आव्हानांवर मात करत त्यांनी श्रीकल्पवृक्ष उद्योग समूहाची यशस्वी उभारणी केली असून, हा प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रसंगी युवा उद्योजक भाऊसाहेब ढेबे-पाटील यांनी आमदार विनयजी कोरे सावकार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी भाऊसाहेब ढेबे-पाटील यांच्या मातोश्रीही उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मुलाच्या संघर्षमय प्रवासातील आठवणींना उजाळा देत, कठीण परिस्थितीतही खचून न जाता सातत्याने मेहनत केल्यामुळेच आज हे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली. भेटीदरम्यान उद्योग समूहाच्या भविष्यातील विस्तार योजनांबाबतही चर्चा झाली.

# कराडच्या संजीवन मेडिकल सेंटरमध्ये एकाच दिवशी दोन TAVI प्रक्रिया यशस्वी

**कराड (हॅलो न्यूज)**

पश्चिम महाराष्ट्रातील हृदयरोग उपचार क्षेत्रात कराडच्या संजीवन मेडिकल सेंटरने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. सातारा जिल्ह्यात २०२३ मध्ये पहिली TAVI (ट्रान्सकॅथेटर एऑर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन) शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणाऱ्या संजीवन मेडिकल सेंटरने आतापर्यंत आठ TAVI प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आता एकाच दिवशी दोन हृदयरुग्णांवर TAVI प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडत पश्चिम महाराष्ट्रातील असा विक्रम करणारे एकमेव रुग्णालय म्हणून नवा मान मिळविला आहे. अत्यंत क्लिष्ट आणि उच्च तंत्रज्ञानावर आधारित या प्रक्रियेमुळे दोन्ही रुग्णांना नवजीवन मिळाले असून संजीवन मेडिकल सेंटरने प्रगत हृदयरोग उपचारातील आपले अग्रस्थान पुन्हा अधोरेखित केले आहे.



इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. विजयसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनुभवी हृदयरोग तज्ज्ञांच्या पथकाने अत्याधुनिक कॅथलॅबमध्ये आधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दोन्ही प्रक्रिया अत्यंत अचूकपणे पूर्ण केल्या. प्रक्रियेनंतर दोन्ही रुग्णांची प्रकृती स्थिर असून ते उपचारांना उत्तम प्रतिसाद देत आहेत तसेच प्रक्रियेनंतर चौथ्या दिवशी रुग्णास घरी सोडण्यात येत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. (टावी) ही गंभीर एऑर्टिक व्हॉल्व्ह स्टेनोसिस असलेल्या रुग्णांसाठी आधुनिक, सुरक्षित आणि प्रभावी उपचारपद्धती मानली जाते. या आजारात हृदयातील एऑर्टिक झडप अरुंद झाल्याने शरीराला होणारा रक्तपुरवठा कमी होतो. परिणामी श्वास लागणे, छातीत दुखणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडणे तसेच हृदय निकामी होण्याचा धोका वाढतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि ओपन हार्ट शस्त्रक्रियेचा धोका असलेल्या रुग्णांसाठी ही प्रक्रिया जीवदान देणारी ठरते.

या प्रक्रियेत छाती न उघडता मांडीतील रक्तवाहिनीद्वारे विशेष कॅथेटरच्या साहाय्याने नवीन जैविक एऑर्टिक व्हॉल्व्ह हृदयात बसविण्यात येतो. त्यामुळे मोठ्या शस्त्रक्रियेची गरज राहत नाही, रक्तस्त्राव कमी होतो, रुग्ण लवकर बरा होतो आणि रुग्णालयातील मुक्कामही कमी होतो. त्यामुळे आधुनिक हृदयरोग उपचारामध्ये ही अत्यंत प्रभावी आणि रुग्णस्नेही पद्धत म्हणून ओळखली जाते. या यशस्वी प्रक्रियेत कार्डियाक ॲनेस्थेशिया तज्ज्ञ डॉ. सुहास पाटील, इकोकार्डिओग्राफी तज्ज्ञ डॉ. पुनम बागल, कॅथलॅब टीममधील अमित चोपडे, धनश्री पाटील, जगदीश तसेच अतिदक्षता विभागातील डॉ. तृप्ती फरांदे, स्वप्नील साळुंखे आणि अन्य वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

संजीवन मेडिकल सेंटरमध्ये अत्याधुनिक कॅथलॅबच्या माध्यमातून अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, IVUS, OCT, रोटाब्लेशन, इंट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी, पेसमेकर प्रत्यारोपण तसेच सारख्या प्रगत स्ट्रक्चरल हार्ट प्रक्रिया नियमितपणे केल्या जात आहेत. या नव्या यशामुळे संजीवन मेडिकल सेंटरने सातारा जिल्हा आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत हृदयरोग उपचारातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह केंद्र म्हणून आपली ओळख अधिक भक्कम केली आहे.



# डॉ. सुरेश भोसले यांना ‘साखर उद्योग गौरव पुरस्कार’ प्रदान

## पुणे येथे डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशनकडून सन्मान; देशभरातील साखर उद्योगातील मान्यवरांची उपस्थिती

**कराड (हॅलो न्यूज)**

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांना साखर उद्योगातील उल्लेखनीय व भरीव योगदानाबद्दल डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशनच्यावतीने अत्यंत प्रतिष्ठेचा साखर उद्योग गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. आज पुणे येथील हॉटेल जे.डब्ल्यू. मॅरियटमध्ये आयोजित शानदार सोहळ्यात राज्याचे माजी मंत्री आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते डॉ. सुरेश भोसले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.


डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशनच्या ७१ व्या वार्षिक परिषदेचे आणि शुगर एक्स्पो इंडियाचे आयोजन पुणे येथे करण्यात आले होते. आ. पाटील यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राजेश टोपे, श्रीमंत पाटील, साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, एस. एस. इंजिनिअर्सचे व्यवस्थापकीय संचालक एस. बी. भाड, महुआ सहकारी खंड उद्योगचे अध्यक्ष एम. के. पटेल, शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष संजय अवस्थी, साऊथ इंडिया शुगर अँन्ड शुगरकेन टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष आर. व्ही. कुंभार, नॅशनल शुगर इन्स्टिट्यूटचे संचालक अरविंदकुमार रावत, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे महासंचालक संभाजी कडू-पाटील, प्रकाश नाईकनवरे, संजय खताळ, एस. एस. शिरगावकर, एस. डी. भोकरे, सी. जी. माने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# डोहकार श्रीनिवास कुलकर्णी यांचे निधन

**सांगली (हॅलो न्यूज)**

ज्येष्ठ मराठी साहित्यिक, कथाकार व ललित लेखक डोहकार श्रीनिवास विनायक कुलकर्णी (वय ९२) यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने कराडच्या साहित्यविश्वातील एक संवेदनशील आणि समृद्ध साहित्यिक व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा आर्किटेक उदयन, आलोक सुना, नातवंडे असा परिवार आहे. सांगली जिल्ह्यातील औंदुंबर गावी जन्मलेले होते. शिक्षण संपल्यानंतर त्यांनी पॉवर पेंटिंगचा व्यवसाय केला. ओगले ग्लास वर्क्समध्येही त्यांनी काही काळ नोकरी केली. त्यानंतर मुंबईच्या मौज प्रकाशन संस्थेत संपादन विभागात आजअखेर काम केले.




‘डोह’, ‘सोन्याचा पिंपळ’, ‘पाण्याचे पंख’, ‘कोरडी भिक्षा’ यांसह त्यांच्या ललित लेखनातून वाचकांना निसर्ग, माणूस आणि जीवनाकडे पाहण्याचा वेगळा अनुभव मिळाला. अखिल भारतीय ७६ व्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्र फाउंडेशनचा साहित्य पुरस्कार तसेच ‘वि. दा. करंदीकर जीवनगौरव सन्मान’ त्यांना मिळाला होता. कराड नगरपरिषदेतर्फेही त्यांना सन्मानपत्र देऊन नुकताच त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव केला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या येथील शाखेतर्फे तसेच श्री. कालिकादेवी पतसंस्थेतर्फेही त्यांचा गौरव झाला होता.

# आखाडीनिमित्त कराडमध्ये मद्यधुंद २२ वाहनचालकांवर कारवाई

**कराड (हॅलो न्यूज)**

आखाडीच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी पार्ट्या आणि मद्यप्राशन करून वाहन चालवण्याचे प्रमाण वाढले आहे. त्या पार्श्वभूमीवर कराड शहर वाहतूक पोलिसांनी विशेष नाकाबंदी मोहीम राबवली. यात मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या २२ वाहनचालकांवर कारवाई केली.

सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कोल्हापूर नाका तसेच कृष्णा कॅनॉल परिसरात विशेष नाकाबंदी करण्यात आली होती. वाहनचालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मद्यप्राशन करून वाहन चालवित असल्याचे आढळून आलेल्या २२ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील आणि पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक संतोष जगदाळे, पोलीस उपनिरीक्षक आर. डी. देशमुख, सहाय्यक फौजदार मोहन जगताप, पोलीस हवालदार गोकुळ हादगे, जयवंत गोसावी, अश्विनी सूर्यवंशी, रतन चव्हाण, अमोल पवार, सत्यजीत नेवसे, सचिन साळुंखे, पोलीस नाईक महेंद्र सावंत तसेच पोलीस शिपाई शशिकांत घाडगे, प्रशांत मोहिते, अक्षय खोत, शिवनंदन नारायणी आणि आशिष पाटील यांनी सहभाग घेतला. आखाडीच्या काळात मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरोधात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असून नागरिकांनी स्वतःच्या व इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करावे आणि मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.